शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०९/२०२४

| | | |
|---|---|---|
| डॉ. सयाजी शिवाजी दिडवाघ<br>रा.मु.माळवाडी,पो.वरकुटे म्हसवड,<br>ता.माण,जि.सातारा. | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. रयत शिक्षण संस्था, सातारा,<br>पोवई नाका, सातारा<br><br>२. दहिवडी कॉलेज,दहिवडी<br>ता.माण,जि.सातारा. | } | वि.प. |

रयत शिक्षण, सातारा या संस्थेचे दहिवडी कॉलेज दहिवडी, ता.माण, जि.सातारा येथील शिक्षक (सी.एच.बी.) डॉ. सयाजी शिवाजी दिडवाघ यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०९/०९/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार खालीप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात (जोड पत्रकाप्रमाणे) अनुदानित तसेच विनाअनुदानित तत्वावर पदवी व पदवीत्तर वर्गाचे अध्यापन तासिका तत्वावर आदेश प्राप्त करून पूर्ण वेळ काम केलेले आहे. जून २०१६ पासून ते आजपर्यंत आदेशातील कालावधीमध्ये आदेशात नसलेल्या कालावधीमध्ये देखील मी अध्यापन परीक्षा (विद्यापीठ तसेच महाविद्यालय) शासनमान्य माती व परीक्षण प्रयोगशाळा हे काम पाहिले आहे. तरी वरील सर्व माझा अनुभव पाहता संस्थेमध्ये माझ्या विषयाच्या सध्या रिक्त असलेल्या जागांवर माझी अनुदानित पदावर कायमस्वरूपी पूर्णवेळ नेमणूक करावी ही विनंती. आवश्यक सर्व माहिती सोबत जोडपत्रामध्ये जोडलेली आहे.

**संस्था महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. तक्रारीच्या संदर्भातील माहिती श्री.दिडवाघ सयाजी शिवाजी यांचा तक्रार अर्ज महाविद्यालयास दि.०४/१०/२०२४ रोजी प्राप्त झाला. श्री.दिडवाघ यांनी यापूर्वी महाविद्यालयाकडे अशा प्रकारचा तक्रार अर्ज आजअखेर केलेला नाही.

२.        विद्यापीठ परीक्षा कामकाज व इतर अध्यापनेत्तर कामाचे मानधन श्री.दिडवाघ यांना दिलेले आहे. श्री.दिडवाघ यांना तासिका तत्वावर नियुक्ती आदेश आहे. परंतु त्यांचे तोंडी विनंतीनुसार विनाअनुदानित विभागाकडील घेतलेल्या कार्यभाराचे मानधन महाविद्यालयाने ज्या त्या वेळी त्यांना अदा केलेले आहे. श्री.दिडवाघ यांनी पुर्णवेळ नियुक्तीची मागणी तक्रार अर्जात केलेली आहे. परंतू नवीन पुर्णवेळ अनुदानित जागेवर उपलब्ध रिक्त जागेनुसार शासन नियमानुसार जाहिरात देवून विद्यापीठ निवड समितीमार्फत मुलाखत घेवून निवड प्रक्रिया केली जाते. संस्थेने तासिका तत्वावरील सर्व नियुक्त्या हया तात्पुरत्या स्वरूपात ठराविक कालावधीसाठी दिलेल्या आहेत.उमेदवारास सदर जागेवर कोणताही हक्क/दावा करता येणार नाही, हे नेमणूक आदेशामध्येच नमुद केलेले आहे व ते हजर होताना स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्रावर उमेदवाराने लिहून दिलेले आहे.

तसेच दि.२४/०२/२०२५ रोजीच्या पत्रामध्ये - श्री.दिडवाघ यांची नेमणूक महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्वानुसार व नियमानुसार रयत शिक्षण संस्था, सातारा यांचेकडून देण्यात येते व विद्यापीठ मान्यतेनुसार मा.सहसंचालक यांचेकडून तासिका तत्वावरील वेतन अनुदान मिळते. श्री.दिडवाघ यांच्यासाठी कोणतीही वेगळी पध्दत अवलंबता येणार नाही असे नमूद केलेले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांचे तक्रारीनुसार त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात अनुदानित तसेच विनाअनुदानित तत्वावर पदवी व पदव्युत्तर वर्गाचे अध्यापन तासिका तत्वावरचे आदेश प्राप्त करून पूर्णवेळ काम केले आहे. तक्रारीसोबत त्यांनी केलेल्या हंगामी सेवेचा तपशील असा तक्ता तक्रारी सोबत जोडला आहे. या तक्त्यामध्ये महाविद्यालयाचे नाव, अनुदान प्रकार, नियुक्ती प्रकार, दिनांकापासून दिनांकापर्यंत व केलेल्या सेवेचा कालावधी अशा स्वरूपाची माहिती आहे. या तक्त्यामध्ये तक्रारदार यांनी केलेल्या हंगामी सेवेचा/नियुक्तीचा प्रकार विचारात घेतला असता, सर्व नियुक्त्या तासिका तत्वावर दिसून येतात.

तक्रारीसोबत तक्रारदार यांनी नियुक्ती आदेश व त्याअनुषंगाने हजर निवेदन जोडले आहेत. संस्थेनेदेखील या नियुक्त्या नाकारलेल्या नाहीत. या कागदपत्रांसोबत तक्रारदारांनी महाविद्यालयाकडील पदव्युत्तर रसायनशास्त्र अधिविभागाकडील एम.एस्सी. २ ऑरगॅनिक केमिस्ट्रीचे वेळापत्रक जोडले आहे. तसेच २०२३ मध्ये वरिष्ठ पर्यवेक्षक कामकाजाबाबतची पत्रे जोडली आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडील सुपरवायझर म्हणून काम करणेबाबत दिलेली पत्रे जोडली आहेत. सोबत केलेल्या कामाच्या दिवसांचा तक्ता, हजेरी पत्रक व बॅंक स्टेटमेंट प्रती जोडल्या आहेत.

तक्रारदार यांच्या तक्रारीस संस्थेने दिलेल्या म्हणण्यानुसार तक्रारदार तासिका तत्वावर सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र या विषयाचे अध्यापन करीत आहेत. त्यांची नेमणूक महाराष्ट्र शासन मार्गदर्शक तत्वानुसार व नियमानुसार देण्यात आली आहे. विद्यापीठ मान्यतेनुसार व सहसंचालक यांचेकडून तासिका तत्वावर वेतन अनुदान मिळते. सबब संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांना कोणतीही वेगळी पध्दत अवलंबता येणार नाही अशा स्वरूपाचे म्हणणे देवून तक्रारदाराच्या तक्रारीस विरोध दर्शविला.

तक्रारदार यांनी सुनावणीदरम्यान मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयांकडील काही निवाडे यांचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या निवाडयातील मार्गदर्शक तत्वांनुसार त्यांची सेवा नियमित व पूर्णवेळ करण्यात यावी. न्यायालयाचे निर्णय असल्याने त्यांना याप्रमाणे न्याय मिळावा. तक्रारदार यांनी जोडलेले मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निवाडयांचे अवलोकन करताना असे दिसून येते की, अर्जदारांनी केवळ, त्यांना उपयुक्त असणारे त्यामधील कलम एकत्रित करून त्यांनी तो समितीसमोर सादर केला आहे. पूर्ण निकालपत्रे हजर केलेले नाहीत. त्यामुळे त्या निवाडयातील तथ्ये व हया प्रकरणांतील तथ्ये हयांचा मेळ घालता येत नाही. सुनावणीदरम्यान तक्रारदार यांनी सादर केलेले न्यायनिवाडे त्यांच्या प्रकरणास लागू होत असल्याचा युक्तिवाद केला. सादर केलेले न्यायनिर्णय समितीने अवलोकनी घेतले. समितीच्या असे निर्देशनास आले की, या न्यायालयीन प्रकरणातील काही प्रकरणांतील वस्तुस्थितीचे तक्रारदार यांच्या प्रकरणांमधील वस्तुस्थितीशी साम्य नाही. काही न्यायालयीन प्रकरणांमधील नियुक्त्या या नियमित पदाकरिताच्या भरतीकरिता असणारी प्रक्रिया राबवून नियुक्ती मात्र तात्पुरत्या स्वरूपाची दिल्याची दिसून येते. परंतु तक्रारदारांच्याबाबत त्यांची नियुक्ती त्यांचे नियुक्ती तात्पुरत्या स्वरूपाची असून त्या नियुक्तीस विहित प्रक्रिया अवलंबलेली नसल्याचे दिसून येते. सबब समितीच्या मते तक्रारदार यांनी सादर केलेले न्यायनिवाडे तक्रारदाराच्या या प्रकरणास लागू होत नाहीत. समितीच्या मते, तक्रारदारांच्या सर्व नियुक्त्या तासिका तत्वावर महाविद्यालयाच्या विनाअनुदानित विभागाकडील पदावर झाल्या असून तक्रारदार यांची निवड स्थानिक समितीद्वारे विशिष्ट कालावधीकरिता दिसून येते. त्यांची निवड विद्यापीठ निवड समितीद्वारा झालेली नाही तसेच नियुक्ती दरम्यान ते शैक्षणिक पात्रता ही धारण करीत नव्हते. त्यांनी पीएच.डी. ही शैक्षणिक अर्हता सन २०१६ या वर्षात पूर्ण केल्याचे दिसून येते. तक्रारदाराने जोडलेल्या कागदपत्रांवरून त्यांच्या नियुक्तीस शासन व विद्यापीठाची मान्यता तासिका तत्वावरचीच दिसून येते. समितीच्या असे ही निर्देशनास आले की, तक्रारदार यांची नियुक्ती नियमित पदाकरिता असणारे नियम व शासननिर्णय यांस अनुसरून झालेली नाही. सबब, समिती सर्वानुमते या निर्ष्कषाप्रत येते की, तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये केलेली मागणी मान्य करता येणार नाही.

## आदेश

प्रस्तुतची तक्रार खारिज करण्यात येत आहे

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

दिनांक : 28 APR 2025

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)